
# श्रीमद्भगवद्गीता अनुबंधचतुष्टय



## १. अधिकारी

अधिकारी = ज्या व्यक्तीने याजन्मीं किंवा पूर्वजन्मीं निष्काम कर्म व उपासना करून मल व विक्षेप हे दोन दोष निवृत्त केले असून फक्त स्वरूपाचे (ब्रह्मस्वरूपाचें) आवरण ज्याच्या चित्तांत आहे व आवरणनिवृत्तीकरिता जो साधनचतुष्टययुक्त आहे तो वेदांतशास्त्रविचाराचा अधिकारी म्हणावा.

- श्रद्धा-भक्तिवान सर्ववर्णाश्रमी
  श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथाचा अधिकारी सर्व व्यक्ती आहेत, फक्त ती व्यक्ती श्रद्धा-भक्तीवान असावी इतकेच.

## २. विषय

विषय :- जीवब्रह्माचे ऐक्य, प्रमाणाने व युक्तीने प्रतिपादन करणे हा ग्रंथाचा विषय आहे.

- जीवब्रह्मैक्यज्ञान
  जीवब्रह्मैक्य :- जीव आणि ब्रह्म यांचे एकत्व यास जीवब्रह्मैक्य म्हणतात.
  जीवब्रह्मैक्यज्ञान जोंवर 'अज्ञात, अप्राप्त' असतें तोंवर ते "विषय" असतें व 'ज्ञान, प्राप्त झालें असतां' तेंच ज्ञान 'अवांतर प्रयोजन' असते, ही गोष्ट विशेष ध्यानांत असावी.

## ३. प्रयोजन

प्रयोजन :- फल

- १. अवांतर प्रयोजन (जीवब्रह्मैक्यज्ञानप्राप्ति)
  अवांतर प्रयोजन :- म्हणजे अमुख्य, गौण, अप्रधान फल होय.
  जीवब्रह्मैक्यज्ञान हे मोक्षाचे साधन आहे म्हणून अवांतर प्रयोजन आहे.
- २. परम प्रयोजन (मोक्षप्राप्ति)
  परम प्रयोजन :- मुख्य, प्रधान फल
  सकल दु:खनिवृत्तिरूप व परमानंद प्राप्तिरूप "मोक्ष" प्राप्त होणें, हेंच ग्रंथाचें 'परम प्रयोजन' होय
  - मोक्षप्राप्तीचे मुख्य दोन मार्ग
    श्रीमद्भगवद्गीतेत प्रतिपादन केल्यानुसार
    - १. सांख्ययोग
      सर्व पदार्थ मृगजळाप्रमाणे किंवा स्वप्नसृष्टीसारखे मायामय आहेत. त्यामुळे "मी कर्ता" हा मिथ्याभिमान सोडून देऊन, सदासर्वदा सर्वव्यापी सच्चिदानंदघन परमात्मस्वरूपात एकरूप होऊन रहावे.
      - अधिकारी
        - देहाभिमानरहित असावा
          - संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।
            योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिरेणाधिगच्छति ॥ ५-६ ॥
            परंतु हे महाबाहो अर्जुना, कर्मयोगाशिवाय मन इंद्रिये व शरीर यांच्याकडून होणाऱ्या सर्व कर्मांच्या बाबतीत कर्तेपणाचा त्याग होणे कठीण आहे. आणि भगवत्स्वरूपाचे चिंतन करणारा कर्मयोगी परब्रह्म परमात्म्याला फार लवकर प्राप्त होतो. ॥ श्रीमद्भगवद्गीता अध्याय ५ श्लोक ६ ॥
      - नैव किञ्चित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।
        पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन् ॥५-८ ॥
      - प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।
        इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥ ५-९ ॥
        सांख्यायोगी तत्त्ववेत्याने पाहात असता, ऐकत असता, स्पर्श करीत असता, वास घेत असता, भोजन करीत असता, चालत असता, झोपत असता, श्वासोच्छ्वास करीत असता, बोलत असता, टाकीत असता, घेत असता, तसेच डोळ्यांनी उघडझाप करीत असतानाही सर्व इंद्रिये आपापल्या विषयांत वावरत आहेत, असे समजून निःसंशय असे मानावे की, मी काहीच करीत नाही. ॥ श्रीमद्भगवद्गीता अध्याय ५ श्लोक ८ व ९ ॥
    - २. कर्मयोग
      कर्मात लिप्त न होता कर्तव्यबुद्धीने निष्काम कर्म करणे.
      - योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनञ्जय ।
        सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ २-४८ ॥
        हे धनंजय अर्जुना, तू आसक्ती सोडून तसेच सिद्धी आणि असिद्धी यामध्ये समान भाव ठेवून योगात स्थिर होऊन कर्तव्य कर्मे कर. समत्वालाच योग म्हटले जाते. ॥ श्रीमद्भगवद्गीता अध्याय २ श्लोक ४८ ॥
      - ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः ।
        लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ॥ ५-१० ॥
        जो पुरुष सर्व कर्मे परमात्म्याला अर्पण करून आणि आसक्ती सोडून कर्मे करतो, तो पुरुष पाण्यातील कमलपत्राप्रमाणे पापाने लिप्त होत नाही. ॥ श्रीमद्भगवद्गीता अध्याय ५ श्लोक १० ॥

## ४. संबंध

संबंध :- अधिकारी, विषय आणि प्रयोजन यांचे परस्परसंबंध

- १. फल व अधिकारी यांमध्ये प्राप्यप्रापकभाव
  प्राप्यप्रापकभाव :- अधिकारी हा मोक्षरूप फलाची इच्छा करतो, म्हणून अधिकारी आणि फल या दोहींमध्ये प्राप्यप्रापकभावसंबंध आहे.
- २. अधिकारी व विषय यांमध्ये कर्तृकर्तव्यभाव
  कर्तृकर्तव्यभाव :- अधिकारी हा कर्ता आणि विषय कर्तव्य असल्याने अधिकारी आणि विषय या दोहींमध्ये कर्तृकर्तव्यभावसंबंध आहे.
- ३. विषय व ग्रंथ यांमध्ये प्रतिपाद्यप्रतिपादकभाव
  प्रतिपाद्यप्रतिपादकभाव :- विषय हा प्रतिपाद्य असून ग्रंथ प्रतिपाद्यक असल्याने विषय व ग्रंथ या दोहींचा प्रतिपाद्यप्रतिपादकभावसंबंध आहे.
- ४. जीवब्रह्मैक्यज्ञान व ग्रंथ यांमध्ये जन्यजनकभाव
  जन्यजनकभाव :- ग्रंथ उत्पन्न करणारा म्हणून जनक आणि जीवब्रह्मैक्यज्ञान उत्पन्न होणारे म्हणून जन्य असल्याने ग्रंथ आणि जीवब्रह्मैक्यज्ञान या दोहींचा जन्यजनकभावसंबंध आहे.

https://bhagvadgita.khandbahale.org